दिनांक:- २६.१२.२०१७

**महानिर्मिती**

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित**

**सरळसेवा जाहिरात क्र.०७(Jun)/२०१७ अंतर्गत 'निम्नस्तर लिपीक (मासं) व निम्नस्तर लिपीक (लेखा)' या पदांच्या सरळसेवा पद भरतीच्या अनुषंगाने तात्पुरत्या निवड / प्रतिक्षा सूची यादीत निवड झालेल्या उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीकरीता उपस्थित राहण्याबाबत.**

महानिर्मिती सरळसेवा जाहिरात क्र. ०७(Jun)/२०१७ अंतर्गत 'निम्नस्तर लिपीक (मासं) व निम्नस्तर लिपीक (लेखा)' या रिक्त पदांच्या भरतीसाठी घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षेत उमेदवारांना प्राप्त झालेल्या गुणांस अनुसरुन गुणानुक्रमे तसेच जाहिरातीत देण्यात आलेल्या 'निम्नस्तर लिपीक (मासं) व निम्नस्तर लिपीक (लेखा)' यांच्या रिक्त पदांची उपलब्ध संख्या व समांतर आणि सामाजिक आरक्षण विचारात घेवून पात्र ठरलेल्या उमेदवारांची 'निम्नस्तर लिपीक (मासं) व निम्नस्तर लिपीक (लेखा)' या पदांची तात्पुरती निवड / प्रतिक्षा सूची यादी ही दि.०७.१२.२०१७ रोजी महानिर्मिती कंपनीच्या www.mahagenco.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. 'निम्नस्तर लिपीक (मासं) व निम्नस्तर लिपीक (लेखा)' या पदांची तात्पुरती निवड / प्रतिक्षा सूची यादी तयार करताना खुल्या (Open) प्रवर्गाच्या निवडीकरीता ४० गुणांचा व मागास (Backward Class) प्रवर्गाच्या निवडीकरीता ३० गुणांचा निकष ठेवण्यात आलेला आहे. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१) उमेदवारांची तात्पुरती निवड ही उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेत प्राप्त झालेल्या गुणांनुसार तसेच उमेदवारांनी सिस्टीम जनरेटेड अर्जामध्ये दर्शविलेली त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, जात, उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे, इत्यादी माहितीच्या आधारे करण्यात आलेली असून इत्यादी बाबतचे मूळ प्रमाणपत्राची कागदपत्रे पडताळणीवेळी तपासणी करण्यात येईल.

२) तात्पुरती निवड करण्यात आलेल्या सर्व उमेदवारांनी त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, जात, उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे, इत्यादी सर्व मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणीवेळी सादर करणे बंधनकारक राहील व ती सादर करु न शकल्यास उमेदवाराची निवड तात्काळ रद्द करण्यात येईल.

३) मागासवर्गिय प्रवर्गातील उमेदवारांनी तसेच महिला उमेदवारांनी ज्यांची तात्पुरती निवड / प्रतिक्षा सूची यादीतील निवड ही महिला आरक्षणातंर्गत (WR) करण्यात आलेली असेल (अनुसूचित जाती हा प्रवर्ग वगळून) अशा उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र जाहिरातीस अनुसरुन 'निम्नस्तर लिपीक (मासं) व निम्नस्तर लिपीक (लेखा)' या पदांकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना कागदपत्रे पडताळणीच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले असणे व कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी वैध असणे आवश्यक आहे.

४) ज्या महिला उमेदवारांची तात्पुरती निवड / प्रतिक्षा सूची यादीतील निवड ही खुल्या प्रवर्गात महिला आरक्षणातंर्गत (WR) करण्यात आलेली असेल अशा महिला उमेदवारांनी खुल्या प्रवर्गातून महिला आरक्षणाकरीता लागू असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र जाहिरातीस अनुसरुन 'निम्नस्तर लिपीक (मासं) व निम्नस्तर लिपीक (लेखा)' या पदांकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना कागदपत्रे पडताळणीच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले असणे व कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी वैध असणे आवश्यक आहे.

५) तात्पुरत्या निवड / प्रतिक्षा सूची यादीत नावाचा समावेश आहे म्हणून नेमणूक देण्याबाबतचा कोणताही हक्क उमेदवारांना राहणार नाही. ही निवड यादी पूर्णत: जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव आणि इतर अटी व शर्ती पूर्ण करण्याच्या अधीन राहून तयार करण्यात आलेली आहे.

६) 'निम्नस्तर लिपीक (मासं) व निम्नस्तर लिपीक (लेखा)' या पदांसाठी आवश्यक असलेली पूर्वावश्यकता धारण करीत नसल्याचे किंवा नेमणूकीसाठी आवश्यक असलेल्या अटींचा किंवा जाहिरातीमधील कोणत्याही अटीचा व शर्तीचा भंग होत असेल तर संबंधीत उमेदवारांची निवड कोणत्याही टप्प्यावर ताबडतोब रद्द करण्यात येईल.

७) जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे उमेदवारांजवळ असलेली सर्व आवश्यक प्रमाणपत्रे / कागदपत्रे (शैक्षणिक अर्हता व अनुभव वगळून) ही जाहिरातीस अनुसरुन 'निम्नस्तर लिपीक (मासं) व निम्नस्तर लिपीक (लेखा)' या पदांकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज करताना कागदपत्रे पडताळणीच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेली असणे व कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी वैध असणे आवश्यक आहे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. ज्या उमेदवारांजवळ आवश्यक प्रमाणपत्रे / कागदपत्रे ही कागदपत्रे पडताळणीच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेली नसतील व कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी वैध नसतील अशा उमेदवारांची उमेदवारी ताबडतोब रद्द करण्यात येईल व सदर प्रकरणी कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल महानिर्मिती कंपनीतर्फे घेण्यात येणार नाही. तसेच उमेदवार जाहिरातीत नमूद शैक्षणिक अर्हता व अनुभव हा जाहिरातीस अनुसरुन 'निम्नस्तर लिपीक (मासं) व निम्नस्तर लिपीक (लेखा)' या पदांकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना जाहिरातीच्या शेवटच्या दिनांकास धारण करीत असणे आवश्यक आहे.

८) 'निम्नस्तर लिपीक (मासं) व निम्नस्तर लिपीक (लेखा)' या पदांच्या तात्पुरत्या निवड यादीतील उमेदवार कागदपत्रे पडताळणीत अपात्र आढळून आल्यास महानिर्मिती कंपनीच्या आवश्यकतेप्रमाणे प्रतिक्षा यादी कार्यान्वीत करण्यात येईल. याबाबतचा अधिकार महानिर्मिती कंपनी राखून ठेवीत आहे.

९) कागदपत्रे पडताळणीकरीताची तात्पुरती निवड / प्रतिक्षा सूची यादी घोषित करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे. तथापि, अनावधनाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करण्याचा अधिकार महानिर्मिती कंपनीने राखून ठेवलेला आहे.

१०) 'निम्नस्तर लिपीक (मासं) व निम्नस्तर लिपीक (लेखा)' या पदांची तात्पुरती निवड / प्रतिक्षा सूची यादी तयार करताना ऑनलाईन परीक्षेत समान गुण प्राप्त झालेल्या उमेदवारांच्या बाबतीत जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे उमेदवारांची जन्मतारीख विचारात घेऊन त्यांच्यातील जेष्ठताक्रम ठरविण्यात आलेला आहे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

११) कागदपत्रे पडताळणीकरीता उपस्थित राहताना उमेदवारांनी ऑनलाईन प्रणालीद्वारे भरलेला अर्ज,त्यांची मूळ (Original) कागदपत्रे तसेच कागदपत्रांचा स्वसाक्षांकित (Self Attested) केलेला एक छायांकित संच (One Zerox copy set) स्वत:जवळ बाळगावा. तसेच आवश्यक सर्व कागदपत्रे घेऊनच उमेदवाराने कागदपत्र पडताळणीकरीता उपस्थित राहावे.

१२) कागदपत्रे पडताळणीकरीता उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांनी वाम मार्गाचा अवलंब केल्याचे (जसे राजकीय दबाव, खोटी कागदपत्रे सादर करणे, धमकी देणे व इतर कोणतेही गैरकृत्य) निदर्शनास आल्यास उमेदवाराची निवड ही भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यांवर ताबडतोब रद्द करण्यात येईल.

१३) जाहिरात क्र.०७(Jun)/२०१७ च्या भरती प्रक्रियेचा अभिलेख निकाल घोषित केल्याच्या दिनांकापासून तीन (३) महिन्याच्या कालावधीसाठी जतन करण्यात येईल. त्यापुढील काळात कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

१४) अयशस्वी उमेदवारांनी कोणत्याही प्रकारचे पत्रव्यवहार महानिर्मिती कंपनीकडे करु नये. उमेदवारांच्या कोणत्याही पत्र व्यवहाराची महानिर्मिती कंपनीकडून दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**'निम्नस्तर लिपीक (मासं) व निम्नस्तर लिपीक (लेखा)' या पदांच्या तात्पुरत्या निवड / प्रतिक्षा सूची यादीकरीता निवड करण्यात आलेल्या उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीकरीता उपस्थित राहताना त्यांनी ऑनलाईन प्रणालीद्वारे भरलेला अर्ज, त्यांचे मूळ (Original) कागदपत्रे तसेच कागदपत्रांचा स्वसाक्षांकित (Self Attested) केलेला एक छायांकित संच (One Zerox copy set) घेऊन कागदपत्रे पडताळणीकरीता खालील नमूद ठिकाणी दर्शविलेल्या दिवशी व वेळेवर उपस्थित राहावे. नमूद दिनांक व वेळेनंतर कागदपत्रे पडताळणीकरीता उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांची कोणत्याही परिस्थितीत दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.**

| अ.क्र. | पदाचे नाव | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | निम्नस्तर लिपीक (मासं) | २८.१२.२०१७ | सकाळी १०.०० ते सकाळी ११.०० |
| २ | निम्नस्तर लिपीक (लेखा) | २८.१२.२०१७ | सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० |

**कागदपत्रांच्या पडताळणीकरीता तात्पुरत्या निवड / प्रतिक्षा सूची यादीत निवड झालेल्या उमेदवारांनी खालील नमूद पत्यावर उपरोक्त तक्यात नमूद केल्याप्रमाणे दिलेल्या दिनांक व वेळेनुसार उपस्थित राहावे.**

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित,**
**एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत ईमारत, १ ला मजला,**
**टाटा पॉवर जवळ, लेबर कॅम्प, धारावी रोड,**
**माटुंगा, मुंबई-४०० ०१९**
**दूरध्वनी क्रमांक : ०२२-२४०९०३५१ / २४०७७४४१**

(विनोद बोंदरे)
कार्यकारी संचालक (मासं)
महानिर्मिती